औद्योगिक किंवा वाणिज्यिक प्रयोजनार्थ ग्रामपंचायतींकडून नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- व्हीपीएम-२०१५/प्र.क्र.३०६/पं.रा.-४**
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७

**वाचा : - शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक ११ डिसेंबर, २०१५**

**शासन परिपत्रक :-**

औद्योगिक किंवा वाणिज्यिक प्रयोजनार्थ ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार ज्या कायद्यान्वये ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली आहे, त्या कायद्यामध्ये विहित केलेला कालावधी किंवा यथास्थिती ३० (तीस) कार्यालयीन दिवसांमध्ये नाहरकत प्रमाणपत्राकरीता अर्ज करणा-या अर्जदारास नाहरकत प्रमाणपत्र दिले गेले नाही तर ते संबंधित ग्रामपंचातीच्या हितास बाधा येणार नाही अशा अटी व शर्तीस अधिन राहून देण्यात आले असे मानण्यात येईल, अशा सूचना स्पष्ट केलेल्या आहेत. तरी “नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचे मानण्यात येईल” याबाबत प्रमाणपत्राची अर्जदाराने मागणी केल्यास अशाप्रकारचे प्रमाणपत्र संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी आवश्यक ती छाननी करुन द्यावे.

अधिसूचित क्षेत्रामध्ये उद्योग उभारण्याकरीता नाहकरत प्रमाणपत्राची मागणी करण्यात आल्यास, संबंधित ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देताना पेसा अधिनियम १९९६ व त्याअंतर्गत ग्रामविकास विभागाने प्रसिध्द केलेल्या पेसा कायदा विषयक नियमांन्वये करण्यात आलेल्या तरतुदींमध्ये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी वरील बाब आपल्या जिल्ह्यातील अधिनस्त संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी व सर्व ग्रामपंचायतींच्या/ग्रुप ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणून द्यावी व उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन घ्यावी.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०१२१४१६२९१९२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R Bankar

Digitally signed by Sanjay R Bankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, cn=Sanjay R Bankar
Date: 2017.10.12 15:20:33 +05'30'

**( संजय बनकर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
२. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
१०.विभागीय आयुक्त, सर्व
११.जिल्हाधिकारी, सर्व

१२.सर्व सह सचिव/उप सचिव /अवर सचिव/कार्यासन अधिकारी (ग्रामविकास विभाग), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१४.माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

१५.सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक

१६.सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत)

१७.सर्व ग्रामपंचायती/ग्रुप ग्रामपंचायती (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत )

१८.माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई

१९. निवडनस्ती कार्यासन पं.रा.४